# महाराष्ट्र विधानसभा

**तिसरे अधिवेशन, २०२५**

**सन २०२५-२६ च्या पुरवणी मागण्यांवरील**

**माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी**

**गुरुवार, दिनांक ११ डिसेंबर, २०२५**

## कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग

**कपात सूचनांची एकूण संख्या - ३**

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **पूरक मागणी क्रमांक: डी-३**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २४०१, पीक संवर्धन**<br>**बाब क्रमांक: ५९, रूपये:- ५,६४,१५,०००/-**<br>**श्री. गजानन लवटे** |
| (१) | ९५६ | १०० | अंजनगाव सुर्जी येथील तालुका कृषी अधिकारी कार्यालयाची इमारत २००२-२००९ मध्ये उभारण्यात आली होती. सध्या इमारतीचे बांधकाम जुने झाले असल्याने इमारत मोडकळीस आले आहे. तसेच अंजनगाव सुर्जी या तालुक्याची सद्याची लोकसंख्या पाहता शेतीविषयक विविध कामांकरिता वा कार्यालयात येणा-या शेतकऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत असून कार्यालयातील अपुऱ्या जागेमुळे काम करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यासोबतच येथे येणाऱ्या शेतकऱ्यांनाही अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. तसेच शेतकऱ्यांच्या संबंधातील विविध विषयांच्या नस्ती ठेवण्याकरिता देखील या कार्यालयात जागा अपुरी पडत असल्याने या कार्यालयाच्या ठिकाणी नवीन सोयी सुविधांनी सुसज्ज असे इमारत बांधण्याचे तालुका कृषी अधिकारी, अंजनगाव सुर्जी यांनी प्रस्तावित केले आहे. या ठिकाणी नवीन प्रशस्त अशी इमारत उभारल्यास अधिकारी व कर्मचाऱ्यांसोबतच येथे येणाऱ्या शेतकऱ्यांच्या देखील सोयीचे होऊ शकेल. उक्त कार्यालयात काम करणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांना अपुऱ्या जागेमुळे, दैनदिन कामकाजात येणाऱ्या अडचणीमुळे नवीन सुसज्ज इमारतीचे बांधकाम करण्याच्या प्रस्तावा प्रकरणी सकारात्मक विचार करून सदर कार्यालयाच्या ठिकाणी नवीन प्रशस्त असे तालुका कृषी अधिकारी, कार्यालय तालुका बीजगुणून प्रक्षेत्र / कृषी चिकित्सालय या कार्यालयाचे बांधकाम करण्याकरिता मंजुरी देऊन आवश्यक निधी उपलब्ध करून द्यावा, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: डी-३**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २४०१, पीक संवर्धन**<br>**बाब क्रमांक: ६४, रूपये:- २०,००,००,०००/-**<br>**श्री. विजय वडेट्टीवार** |
| (२) | १००१ | १० | गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात योजना शासनाद्वारे राबविण्यात येत असणे सदर प्रकरणांमध्ये शेतमजूर व शेतीमध्ये काम करणाऱ्या विविध कामगारांना याचा लाभ भेटत नसल्याची तक्रार शासनाकडे येत असणे सदर तक्रारीच्या अनुषंगाने बाधित शेतमजुरांना त्याचा शेत अपघात विमा देणे बाबत शासनाकडून व विभागाकडून |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | टाळाटाळ होत असले तरी शासनाने सदर निकष मध्ये बदल आणून गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेमध्ये शेतमजूर व शेतात विविध काम करणाऱ्या मजुरांना या कार्यक्षेत्रात आणण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: डी-३**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २४०१, पीक संवर्धन**<br>**बाब क्रमांक: ६५, रूपये:- २८,०६,८४,०००/-**<br>**श्री. संजय मेश्राम** |
| (३) | ९८२ | १० | उमरेड विधानसभा मतदारसंघातील उमरेड, भिवापूर व कुही या तिन्ही तालुक्यातील हजारो शेतकऱ्यांनी केंद्र व राज्य शासनाच्या पिक विमा योजनेअंतर्गत विमा भरला असूनही, आजपर्यंत त्यांना विमा भरपाईची रक्कम मिळालेली नाही. खरीप हंगामातील पिकांचे व धान उत्पादक शेतकऱ्यांना अतिवृष्टी, नैसर्गिक आपत्ती आणि रोगराईमुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. त्यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडले असून त्यांची आर्थिक परिस्थिती बिकट झाली आहे.या पार्श्वभूमीवर मी पुढील मागण्या करीत आहे: १. तात्काळ थकित पिकविमा भरपाई जाहीर करून वितरित करावी.२. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांची पुनर्मोजणी (reassessment) आवश्यक असल्यास तत्काळ करावी.३. विमा कंपन्या, बँका व प्रशासन यांच्यातील समन्वयाचा अभाव दूर करून ठोस कार्यवाही करावी.४. या भागातील शेतकऱ्यांना विशेष आर्थिक सहाय्य देण्यासाठी पूरक मागणीत तरतूद करावी. सरकारने या गंभीर समस्येकडे तातडीने लक्ष देऊन शेतकऱ्यांचे हक्काचे विमा संरक्षण मिळवून देण्याबाबत, शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

**विधान भवन**
**नागपूर,**
**दिनांक : १० डिसेंबर, २०२५**

**जितेंद्र भोळे,**
**सचिव-१,**
**महाराष्ट्र विधानसभा**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर